**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०७.०५.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०६.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करण्यात आली. तसेच, महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून, रूपये ४३५/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२९३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१४,९५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, युनिट क्र. ५ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २९.०४.२०२६ चे ०९.०० वा. ते दि. ०३.०५.२०२६ चे १२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत, प्लॉट नं. ५१, उदय स्कुल जवळ, अंतुजी नगर, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती पुजा शामलाल कनोडीया, वय ५० वर्षे ह्या त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, परीवारासह शिवनी, मध्य प्रदेश येथे नातेवाईकाचे घरी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी कपाटातुन सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती ५९,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांनी नागेश्वर नगर मैदान येथुन एका संशयीत ईसमास ताब्यात घेतले. इसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव समीर निजाम अंसारी, वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ७६, राणी सती सोसायटी, भांडेवाडी, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कमरेत एक लोखंडी धारदार चाकु व पॅन्टचे खिशात सोन्या—चांदीचे दागिने मिळाल्याने त्यास ताब्यात घेवुन, त्याची विचारपूस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे ईरफान समशाद अन्सारी, रा. भांडेवाडी, नागपुर याचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु, सोन्याची लगड, चांदीचे दागिने असा एकुण १,९२,३००/—रू. चा मुद्देमाल

जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकाने केली.



**<u>३) गुन्हेशाखा, युनिट क्र. १ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.</u>**

फिर्यादी प्रसाद हेरंब फडणविस, वय ५१ वर्षे, रा. प्लॉट नं. १२, जयप्रकाश नगर, नागपुर यांचा रिअल ईस्टेट चा व्यवसाय असुन, त्यांचे पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत, प्लॉट नं. १३२, राजीव नगर, एसआयपी हाऊस, नागपुर येथे वेद पर्च्युन व्हिजन प्रा. लिमीटेड नावाचे ऑफीस आहे. दिनांक १२.०३.२०२६ चे १९.०० वा. ते दि. १३.०३.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे त्यांचे ऑफीसला लॉक लावुन राहते घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे ऑफीसचे दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, कार्यालयातील रोख ५५,०००/— रू. व सोन्या—चांदीचे नाणे तसेच, डिव्हीआर असा एकुण ७२,१५५/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सोनेगांव येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे १) अमोल महादेव राऊत, वय ३८ वर्षे, रा. बोरकुटे ले—आऊट, बुट्टीबोरी, जि. नागपुर २) धनराज उकंडराव बुधकवडे, वय ५४ वर्षे, रा. धुटी, हिंगणा, जि. नागपुर यांना ताब्यात घेवुन, त्यांची विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्या—चांदीचे शिक्के किंमती १,१७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव सोनेगांव पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर व सपोनि. सचिन भोंडे व त्यांचे पथकाने केली.



**<u>४) गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०६.०५.२०२६ चे २०.३० वा. ते २३.३५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी कोंबींग ऑपरेशन दरम्यान, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, वांजरा ले—आऊट, म्हाडा क्वॉर्टर, बिलाल नगर, आजरी—माजरी येथे राहणारा आरोपी नामे शेख आदील शेख करीम, वय ४० वर्षे याचे राहते घरी रेड कार्यवाही केली असता, त्याचे ताब्यात अंमली पदार्थ, हिरव्या रंगाचा गांजा एकुण १९० ग्रॅम वजनाचा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, रोख २३,४७१/—रू, ०१ मोबाईल फोन असा एकुण ३७,२७१/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांने त्याचा साथिदार पाहिजे आरोपी अतीक खान, रा. नाका नं. २, कामठी रोड, नागपुर याचे मदतीने गांजा आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(अ),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी केली.

**<u>५) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई.</u>**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतून मानवी तस्करी व व्यवसायीक लैंगीक शोषणाची जाळी उखडून टाकण्याच्या उद्देशाने नागपूर शहरात सुरू असलेल्या **''ऑपरेशन शक्ती अंतर्गत''** मोहीमेअंतर्गत मानवी तस्करी करणारे तथा देहव्यापार करवुन घेणारे गुन्हेगारांविरूध्द कडक कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०६.०५.२०२६ चे १९.५९ वा. ते दि. ०७.०५.२०२६ चे ०२.५९ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे कोंबींग ऑपरेशन राबवित असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, ऑनलाईन संपर्क करून पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, ओयो फ्लॅगशिप क्रिष्णा हॉटेल, एस.टी. स्टॅण्ड समोर, गणेशपेठ येथे रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी राज नावाचा मोबाईल धारक हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून, पिडीत

मुलींकडुन देहव्यवसाय करवुन घेताना दिसुन आले. घटनास्थळावरून ०१ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. घटनास्थळावरून रोख ३,५००/—रू., एक मोबाईल फोन व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे ६,७३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पाहीजे आरोपी राज नावाचा व वेबसाईट वरील मोबाईल क्रमांक धारक याचेविरूध्द पोलीस ठाणे गणेशपेठ येथे कलम १४३(२)(३) भा.न्या.सं., सहकलम ३, ४, ५, ७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. राहुल शिरे व त्यांचे पथकाने केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, जेएसए हॉस्पीटल, बेलतरोडी रोड, एसओएस शाळेचे बाजुला असलेली बिल्डींग येथे फिर्यादी यांचे ईलेक्ट्रीक वायर फिटींगचे काम सुरू होते. फिर्यादी यांनी कामाकरीता वेगवेगळ्या एम.एम. चे एकुण ४२ वायर बंडले किंमती ४,३९,४८०/—रू. चा मुद्देमाल घटनास्थळी आणुन एका रूममध्ये लॉक करून ठेवला होता. दिनांक ०१.०५.२०२६ चे ०४.१० वा. ते ०४.३० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीने लॉक करून ठेवलेल्या रूमचे लॉक तोडुन त्यातील ईलेक्ट्रीक वायर बंडले एकुण किंमती ४,३९,४८०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी विनोद पांडुरंग आंबुलकर, वय ५६ वर्षे, रा. प्लॉट नं. १०, श्रीकांत अपार्टमेंट, लक्ष्मी नगर, आठ रस्ता चौक, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. कडुस ९३५२३३५४५८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३३४(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट —१

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील ईनर रिंग रोड परिसरात सकाळी ०८.०० ते रात्री १०.०० वा. पर्यंत खाजगी ट्रॅव्हल्स यांना शहरात रस्त्यावर पार्किंग आणि पिकअप व ड्रॉप करीता बंदी घालण्यात आली आहे. तसेच, खाजगी ट्रॅव्हल्स पार्किंग करीता ठिकाणे नियुक्त केले नसल्याने शहरात खाजगी ट्रॅव्हल्स पार्किंग करणार नाही. तसेच, रिंग रोड बाहेर नो पार्किंग क्षेत्रात खाजगी ट्रॅव्हल्स पार्किंग करणार नाही. याबाबतची या

कार्यालयाकडुन पोउपआ./वावि/नाग./ट्रॅव्हल्स बस अधिसुचना/२०२६—१०३८ अन्वये दिनांक १२.०३.२०२६ रोजी अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे.

नमुद अधिसुचनेचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय सहिंता २०२३ चे कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात येईल, याबाबत कळविण्यात आलेले आहे..

तरीसुध्दा, काही खाजगी ट्रॅव्हल्स बसचे संचालक हे आपली खाजगी ट्रॅव्हल्स बस अनाधिकृतपणे कुठेही थांबवून प्रवासी ने—आण करीत असल्याचे दिसुन आल्याने, आज दिनांक ०६.०५.२०२६ रोजी पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत एकुण ०२ खाजगी ट्रॅव्हल्स बसेसवर कलम २२३, २८५ भा.न्या.सं. अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

नमुद अधिसुचनेचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स बसेसवर माहे १ जानेवारी २०२६ ते आज रोजी पर्यंत एकुण ३४ कारवाई करण्यात आलेल्या असुन, यापुढे देखील नमुद कारवाई सुरू राहणार आहे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट —२

आजपासुन फुटपाथ व रस्त्याच्या कडेला असलेल्या भंगार (कबाडी) व जुन्या वाहनांवर वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. नागपूर शहरातील वाहतूक व्यवस्थेत अडथळा निर्माण करणाऱ्या फुटपाथ तसेच, रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे ठेवण्यात आलेले भंगार (कबाडी) साहित्य व जुनी—निष्क्रिय वाहने यांच्याविरुद्ध वाहतूक पोलीस विभागाने संपुर्ण नागपुर शहरात विशेष मोहीम सुरू केली आहे.

या कारवाई दरम्यान अनेक ठिकाणी फुटपाथ अडवून ठेवलेले भंगार (कबाडी) साहित्य तसेच, दीर्घकाळापासून रस्त्याच्या कडेला उभे असलेली निष्क्रिय वाहने हटविण्यात येत असुन, सदरील कारवाईमुळे पादचारी व वाहनधारकांना मोकळा व सुरक्षित मार्ग उपलब्ध होत आहे. ज्यामुळे वाहतूक सुरळीत करण्यात मदत झाली आहे. तसेच, संबंधित भंगार (कबाडी) व्यावसायिक व वाहनमालकांना भविष्यात अशा प्रकारे सार्वजनिक रस्ता किंवा फुटपाथ अडवू नये. अन्यथा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

वाहतूक पोलीस विभागाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी नियमांचे पालन करावे व सार्वजनिक जागेमध्ये अडथळा होईल असे कोणतेही कृत्य टाळावे. सदरील मोहीम अशीच पुढे चालु राहणार आहे.

**( लोहित मतानी, भापोसे )**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नागपूर शहर